**प्रेसनोट** **दिनांक २७/०३/२०१९**

**डेक्कन पोलीस स्टेशन पुणे शहर**

**इलेक्ट्रीक डी.पी. ला लागलेली आग विझवुन संभाव्य धोका टाळले बाबत**

दिनांक २६/०३/२०१८ रोजी १२/०० वा. सुमारास डेक्कन पोलीस स्टेशन येथे फोन व्दारे कॉल प्राप्त झाला की स्वरुप कॉम्लेक्स, स्वातंत्र्य चौक, कर्वे रोड येथे एका इलेक्ट्रीक डी.पी. ला आग लागलेली आहे तरी सदर ठिकाणी पोलीस मदतीची आवश्यकता आहे. असा कॉल प्राप्त होताच श्रीमती शेख, म.पो.शि. ९४५१ यांनी तात्काळ प्रभात मार्शल वरील कर्मचारी श्री कांबळे, पोशि ८७८१ व श्री पवार, पोशि ८८२५ यांना कळविले सदर ठिकाणी मार्शल वरील कर्मचारी रवाना झाले परिस्थितीची पाहणी करुन विलंब न करता नळस्टॉप चौक येथील फायरब्रिगेड ऑफिसला फोन व्दारे कळवुन घटनास्थळी फायरब्रिगेड बोलावुन घेवुन फायरब्रिगेडच्या मदतीने आग वेळेत विझवुन संभाव्य धोका टाळला गेल्याने सदर ठिकाणा वरील नागरीकांनी पोलीस दलाचे आभार मानले.